आजचे पंचांग

दिनांक : ११ ऑगस्ट २०२६ वार : मंगळवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : चतुर्दशी तिथी (१२ ऑगस्ट रात्री ०१:५२ पर्यंत) त्यानंतर अमावस्या तिथी नक्षत्र : पुनर्वसू नक्षत्र (सकाळी १०:०८ पर्यंत) त्यानंतर पुष्य नक्षत्र योग : सिद्धि योग (सायंकाळी ०६:५१ पर्यंत) त्यानंतर व्यातीपात योग करण : विस्ती भद्रा करण



दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


### ज्येष्ठ नागरिकाला मेसेज आला, एसआयआर फॉर्ममध्ये चूक झाली आहे

**पुणे :** मतदार यादी दुरुस्ती अर्जात (एसआयआर फॉर्म) चूक झाल्याची बतावणी करून सायबर चोरट्यांनी एका ज्येष्ठ नागरिकाची चार लाख ४३ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध अलंकार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ नागरिक कर्वेनगरमधील नवसह्याद्री सोसायटीत राहायला आहेत.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३१४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### अमित शहांच्या राजीनाम्यापासून मोदींच्या संसद गैरहजेरीपर्यंत प्रश्न गंभीर; मग झारखंडच्या विद्यार्थ्यांवरच राहुल गांधींना सवाल का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली / रांची :** संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना देशासमोर अनेक गंभीर प्रश्न उभे आहेत. गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी, पंतप्रधान नरेंद्र मोदींची संसद अधिवेशनातील उपस्थिती, विरोधकांचे आरोप, सरकारची जबाबदारी आणि संसदेत उत्तरदायित्वाचा प्रश्न हे मुद्दे चर्चेच्या केंद्रस्थानी आहेत. मात्र, राहुल गांधींच्या पत्रकार परिषदेत किंवा माध्यमांशी संवादात प्रश्न विचारताना या मोठ्या राष्ट्रीय प्रश्नांपेक्षा झारखंडमधील विद्यार्थी आंदोलन आणि त्यावरील पोलिसांच्या कारवाईबाबतच प्रश्न अधिक ठळकपणे विचारले जात असतील, तर हा केवळ योगायोग आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. झारखंडमध्ये गेल्या काही दिवसांपासून जेपीएससी आणि जेएसएससीसह विविध स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि गैरव्यवहाराविरोधात विद्यार्थी आंदोलन करत आहेत. सोमवारी विधानसभेकडे मोर्चा काढणाऱ्या विद्यार्थ्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी काटेरी तारांचे अडथळे उभे केले, ड्रोनद्वारे निगराणी ठेवली आणि काही ठिकाणी पाण्याच्या फवाऱ्यांचा वापर केला. आंदोलनकर्ते अडथळे पार करत पुढे जात राहिल्यानंतर परिस्थिती तणावपूर्ण झाली.

या आंदोलनावर झालेल्या बळाच्या वापराचा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निषेध केला. विद्यार्थ्यांना शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार आहे आणि संवादातूनच प्रश्न सोडवला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. विशेष म्हणजे, झारखंडमध्ये मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये काँग्रेस सहभागी आहे. त्यामुळे राहुल गांधींची भूमिका ही केवळ केंद्राविरोधातील राजकीय टीका नसून सत्तेत सहभागी असलेल्या आपल्या पक्षासमोरही अस्वस्थ करणारा प्रश्न उभा करणारी आहे. मात्र इथेच माध्यमांच्या भूमिकेचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.

# धर्म निवडण्याचा अधिकार गुन्हा नाही; न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला संविधानाचा आरसा दाखवला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**प्रयागराज । प्रतिनिधी**

भारताच्या लोकशाहीची खरी ओळख केवळ निवडणुका घेण्यात नाही, तर प्रत्येक नागरिकाला आपल्या श्रद्धेचा, धर्माचा आणि जीवनपद्धतीचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळण्यात आहे. आणि याच संविधानिक मूल्याची पुन्हा एकदा आठवण करून देणारा महत्त्वपूर्ण निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला आहे.

इस्लाम धर्म स्वीकारण्याचा निर्णय घेतल्यानंतर दोन प्रौढ बहिणींना त्यांच्या वडिलांनी त्यांच्या इच्छेविरुद्ध घरात डांबून ठेवल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. या प्रकरणात अलाहाबाद उच्च न्यायालयाने दोन्ही महिलांना बेकायदेशीररीत्या डांबून ठेवल्याचे मान्य करत वडील आणि उत्तर प्रदेश सरकारला मिळून २५ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. न्यायमूर्ती संदीप जैन यांच्या खंडपीठाने बंदी प्रत्यक्षीकरण याचिकेवर हा आदेश दिला.



या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा केवळ २५ लाख रुपयांची नुकसानभरपाई नाही. प्रश्न आहे तो एखाद्या प्रौढ भारतीय नागरिकाला स्वतःचा धर्म निवडण्याचा अधिकार आहे की नाही, हा.

एखादी व्यक्ती हिंदू राहायची की इस्लाम स्वीकारायचा, ख्रिश्चन धर्म स्वीकारायचा की बौद्ध, शीख किंवा कोणत्याही अन्य श्रद्धेचा स्वीकार करायचा हा निर्णय तिच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा भाग आहे. संविधान प्रत्येक व्यक्तीला अंतःकरणाचे स्वातंत्र्य तसेच धर्म मानण्याचा, आचरण करण्याचा आणि प्रचार करण्याचा अधिकार देते. त्यामुळे एखाद्या प्रौढ व्यक्तीच्या धर्मनिवडीला केवळ कुटुंबाची किंवा समाजाची पसंती नाही म्हणून बेकायदेशीरपणे रोखता येत नाही.

याहून गंभीर बाब म्हणजे, या दोन महिलांना त्यांच्या धर्मनिवडीच्या पार्श्वभूमीवर घरातच बंदिस्त करण्यात आले. म्हणजेच प्रश्न केवळ धार्मिक स्वातंत्र्याचा नव्हता; तो व्यक्तीच्या शारीरिक स्वातंत्र्याचा आणि घटनात्मक अधिकारांचा होता. न्यायालयाने याच ठिकाणी हस्तक्षेप केला.

हा निर्णय उत्तर प्रदेश सरकारसाठीही महत्त्वाचा संदेश आहे. राज्य यंत्रणेचे काम नागरिक कोणता धर्म स्वीकारतो हे ठरवणे नाही; तर नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करणे हे आहे. जर एखाद्या प्रौढ व्यक्तीला तिच्या धर्मनिवडीमुळे बेकायदेशीरपणे डांबून ठेवले जात असेल, तर प्रशासनाने निष्क्रिय राहणे हा लोकशाहीचा पराभव ठरू शकतो.

भारताची विविधता ही केवळ घोषवाक्य नाही. मंदिरात जाणारा, मशिदीत जाणारा, चर्चमध्ये जाणारा, गुरुद्वारात माथा टेकणारा किंवा कोणत्याही धार्मिक श्रद्धेशिवाय जीवन जगणारा नागरिक सर्वांना समान संविधानिक संरक्षण मिळणे हीच भारतीय लोकशाहीची खरी ताकद आहे.

म्हणूनच अलाहाबाद उच्च न्यायालयाचा हा निर्णय एका कुटुंबापुरता मर्यादित नाही. तो प्रत्येक राज्य सरकारला आणि समाजाला सांगतो धर्माची निवड व्यक्तीची असू शकते; पण त्या निवडीचा अधिकार संविधानाचा आहे.

## ‘५२ कुळांची ९६ कुळांकडून पडताळणी’च्या वादाने सरकारची कोंडी? जरांगेंचा आक्रमक पवित्रा, सरकारसमोर पुन्हा आरक्षणाचे आव्हान!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड / पुणे : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यात सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्र्यांवर जोरदार टीका केली आहे. विशेषतः जात प्रमाणपत्रांच्या पडताळणीचा मुद्दा आणि ५२ कुळे विरुद्ध ९६ कुळे या चर्चेने राजकीय वातावरण अधिक तापले आहे.

मागील काळातील जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काही जात प्रमाणपत्रांवर आक्षेप किंवा ते अवैध ठरल्याच्या घटनांचा दाखला देत जरांगे यांनी सरकारच्या यंत्रणेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. संभाजीनगरमधील जात प्रमाणपत्रांच्या संदर्भातूनही त्यांनी सरकारला लक्ष्य केले. महसूल विभागाच्या भूमिकेवर आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यपद्धतीवरही त्यांनी तीव्र शब्दांत टीका केल्याचे सांगितले जात आहे.

मात्र या संपूर्ण वादातील महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, जरांगे पाटील यांच्याकडून केले जाणारे आरोप आणि त्यांना मिळणारी माहिती कितपत अधिकृत आणि तथ्याधारित आहे? याचे उत्तर प्रशासनानेच स्पष्ट करणे आवश्यक आहे. आरोप खरे असतील तर कारवाई झाली पाहिजे आणि चुकीचे असतील तर सरकारने अधिकृत कागदपत्रांसह ते जनतेसमोर स्पष्ट केले पाहिजेत.

दुसरीकडे, मराठा आरक्षणाच्या प्रश्नामुळे ओबीसी समाजातही अस्वस्थता निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा संघर्ष केवळ एका समाजाच्या आरक्षणापुरता मर्यादित न राहता दोन सामाजिक घटकांमधील तणाव वाढवणारा ठरू नये, याची जबाबदारी सरकारवर आहे.

जरांगे यांचा आक्रमक पवित्रा आणि सरकारची संभाव्य प्रतिक्रिया यामुळे आता महायुती सरकारसमोर पुन्हा एकदा मोठे आव्हान उभे राहिले आहे.

आरक्षणाच्या प्रश्नावर घोषणा नव्हे, तर कायदेशीरदृष्ट्या टिकणारा आणि सर्व घटकांना विश्वासात घेणारा तोडगा सरकार कधी देणार हा महाराष्ट्रासमोरील खरा प्रश्न आहे.

## पैसे पूर्ण मिळाले नाहीत म्हणून खरेदीखत रद्द करता येणार नाही! सर्वोच्च न्यायालयाचा मालमत्ता व्यवहारांवर मोठा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दिल्ली / वृत्तसंस्था**

मालमत्ता विक्रीच्या व्यवहारात ठरलेली संपूर्ण रक्कम मिळाली नाही, म्हणून नोंदणीकृत खरेदीखत थेट अवैध ठरत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. नोंदणीच्या वेळी विक्रीची रक्कम अंशतः मिळाली असली, तरी मालमत्तेचा मालकी हक्क खरेदीदाराकडे हस्तांतरित होऊ शकतो. उर्वरित रक्कम मिळाली नसेल, तर त्यासाठी ती रक्कम वसूल करण्याचा कायदेशीर मार्ग उपलब्ध आहे; मात्र केवळ पैसे बाकी आहेत म्हणून खरेदीखत रद्द करणे हा उपाय नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. या प्रकरणात दोन मालमत्तांच्या खरेदीसाठी प्रत्येकी ७ हजार रुपये किंमत निश्चित करण्यात आली होती. खरेदीखताच्या नोंदणीवेळी २,५०० रुपये देण्यात आले, तर उर्वरित ४,५०५ रुपये मूळ मालकाच्या वित्तीय संस्था आणि सरकारी विभागांतील थकबाकी भरण्यासाठी राखून ठेवण्यात आले होते. मात्र, उर्वरित रक्कम मिळाली नसल्याचे कारण देत मूळ मालकाने खरेदीखत रद्द करण्यासाठी आणि मालकी हक्क परत मिळवण्यासाठी न्यायालयात धाव घेतली. दिवाणी न्यायालय आणि प्रथम अपील न्यायालयाने हा दावा फेटाळला. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने द्वितीय अपीलमध्ये कनिष्ठ न्यायालयांचे निष्कर्ष बाजूला ठेवले. त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करत दिवाणी न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. न्यायालयाने स्पष्ट केले की, खरेदीखताच्या वेळी अंशतः मोबदला मिळाल्याची माहिती आणि परिस्थिती माहीत असूनही व्यवहार पूर्ण करून त्याची नोंदणी झाली असेल, तर केवळ उर्वरित रक्कम मिळाली नाही म्हणून तो व्यवहार अवैध ठरवता येणार नाही.

## सिंहस्थाच्या नावाने ५०० कोटींच्या बनावट वर्क ऑर्डरचा आरोप; गिरीश महाजन पुन्हा चर्चेत, कुंभमेळ्याच्या कामांभोवती संशयाचे सावट!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक / वृत्तसंस्था**

नाशिकच्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला सुरुवात होण्याआधीच कुंभमेळ्याच्या नावाने कथित बनावट वर्क ऑर्डर आणि ठेकेदारांकडून पैशांची उकळपट्टी केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. तब्बल ४०० ते ५०० कोटी रुपयांच्या कामांच्या बनावट वर्क ऑर्डर तयार करून ठेकेदारांना देण्यात आल्याचा दावा करण्यात आला असून, या प्रकरणामुळे राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत.

महत्त्वाची बाब म्हणजे, या कथित फसवणुकीत नाशिक महापालिका आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त श्री. सिंग यांच्या नावाचा वापर करून बनावट कागदपत्रे तयार करण्यात आल्याचा आरोप आहे. ठेकेदारांना कोट्यवधी रुपयांच्या कामांच्या वर्क ऑर्डर दाखवून त्यांच्याकडून पैसे घेतल्याची तक्रार करण्यात आली आहे.

काही ठेकेदारांनी महाजन यांची भेट घेतल्यानंतर हा प्रकार समोर आल्याचे सांगितले जात आहे. महाजन यांच्या माहितीनुसार, जामनेर तालुक्यातील दोन, जळगावमधील एक आणि धुळ्याशी संबंधित एका व्यक्तीचा या प्रकरणाशी संबंध असल्याची माहिती तक्रारीतून समोर आली आहे. मात्र, नेमके किती ठेकेदार फसले आणि किती रक्कम उकळण्यात आली, याचा अधिकृत आकडा अद्याप समोर आलेला नाही.

कथित बनावट वर्क ऑर्डरवर शासनाच्या अधिकृत कागदपत्रांमध्ये अपेक्षित असलेला क्यूआर कोड नसल्याचे काही ठेकेदारांच्या निदर्शनास आले. त्यानंतर संशय निर्माण झाला आणि चौकशी केल्यानंतर कथित बनावटगिरीचा प्रकार उघड झाल्याचा दावा आहे. काही प्रकरणांमध्ये रोख रक्कम तसेच धनादेश स्वीकारण्यात आल्याची माहितीही समोर आली आहे.

## अमित शाह संसदेत उत्तर देणार, पण अट कशासाठी? विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर देशासमोर स्पष्ट उत्तर देण्याची वेळ!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था**

दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील पोलिसी कारवाईचा मुद्दा अखेर संसदेत उपस्थित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह सभागृहात उत्तर देतील, असे स्पष्ट केले आहे. मात्र, त्याचवेळी विरोधकांनी गृहमंत्र्यांच्या निवेदनात अडथळा आणू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो संसदेत उत्तर देणे ही सरकारची घटनात्मक आणि राजकीय जबाबदारी असेल, तर त्या उत्तरासाठी अटी का?

जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी कथित लाठीचार्ज आणि पेलेट गनचा वापर केल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. या कारवाईबाबत गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी गेल्या काही दिवसांपासून विरोधक करत आहेत. त्याच मुद्द्यावरून संसदेत वारंवार गोंधळ आणि कामकाज तहकूब होत आहे.

आता सरकार चर्चेसाठी तयार असल्याचे सांगत आहे. गृहमंत्री स्वतः उत्तर देणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. ही बाब सकारात्मक आहे. पण उत्तर ऐकण्यासाठी विरोधकांनी शांत राहावे ही अपेक्षा योग्य असली, तरी उत्तर देण्यापूर्वीच ‘अडथळा आणू नका’ अशी अट पुढे करणे हे संसदीय संवादाच्या भावनेला कितपत धरून आहे? कारण प्रश्न केवळ एका आंदोलनाचा नाही. प्रश्न आहे विद्यार्थ्यांवर पोलिसी शक्तीचा वापर का झाला, कोणाच्या आदेशाने झाला, पेलेट गनचा वापर झाला का, जखमी विद्यार्थ्यांची संख्या किती आहे आणि प्रशासनाने परिस्थिती हाताळण्यासाठी इतर पर्याय का वापरले नाहीत, याचा. देशातील कोट्यवधी नागरिक संसदेकडे पाहत आहेत. त्यामुळे गृहमंत्र्यांचे उत्तर हे केवळ सरकारचे निवेदन नसून जनतेसमोरची जबाबदारीची स्पष्टीकरणे असली पाहिजेत. विरोधकांनी उत्तर ऐकावे, तथ्याधारित चर्चा करावी आणि सभागृह चालू द्यावे ही अपेक्षा नक्कीच रास्त आहे. पण त्याचवेळी सरकारनेही अवघड प्रश्नांपासून पळ न घेता प्रत्येक प्रश्नाला स्पष्ट, तथ्यपूर्ण आणि थेट उत्तर देण्याची तयारी दाखवली पाहिजे. पावसाळी अधिवेशनाचे मोजकेच दिवस शिल्लक असताना संसद ठप्प राहणे हा जनतेच्या पैशांचा आणि लोकशाहीच्या वेळेचा अपव्यय आहे. त्यामुळे आता दोन्ही बाजूंनी अहंकार बाजूला ठेवण्याची गरज आहे.

# राम मंदिर देणगी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलली; योगायोग की सत्तेसाठी ‘टायमिंग’चा खेळ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता णछ कार्यक्रमासाठी बाहेर; १७ ऑगस्टपर्यंत तहकूब ˉ संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना निर्णयावर राजकीय प्रश्नचिन्हनवी दिल्ली : अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या देणग्यांमध्ये कथित अपहार आणि भ्रष्टाचार झाल्याच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवरील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी आता १७ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. न्यायालयाच्या थेट देखरेखीखाली विशेष तपास पथकाद्वारे (SIT) चौकशी करावी, अशी मागणी या याचिकांमधून करण्यात आली आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी होणार होती. मात्र, उत्तर प्रदेश सरकारची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता हे संयुक्त राष्ट्रांच्या एका आंतरराष्ट्रीय कार्यक्रमासाठी परदेशात असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली.

कायदेशीरदृष्ट्या पाहता, सरकारच्या प्रमुख विधिज्ञांपैकी एक असलेले सॉलिसिटर जनरल सुनावणीला उपस्थित नसणे आणि त्यासाठी तारीख पुढे जाणे ही प्रक्रिया असामान्य नाही. मात्र, या प्रकरणाचे राजकीय आणि सार्वजनिक महत्त्व लक्षात घेता, या तहकुबीच्या ‘टायमिंग’वर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

### ‘योगायोग’ की राजकीय सोय?

सध्या संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. विरोधकांकडून सरकारला विविध मुद्द्यांवर घेरण्याचा प्रयत्न सुरू असताना अयोध्या राम मंदिराशी संबंधित देणग्यांच्या कथित गैरव्यवहाराच्या आरोपांवरील सर्वोच्च न्यायालयीन सुनावणीला मोठे राजकीय महत्त्व प्राप्त होऊ शकते.

अशा परिस्थितीत सुनावणी आणखी आठवडाभर पुढे जाणे हे केवळ न्यायालयीन वेळापत्रकातील बदल मानायचे की त्यामागे राजकीयदृष्ट्या संवेदनशील विषयाला काही काळासाठी बाजूला ठेवण्याचा परिणाम होतो आहे, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

मात्र, तुषार मेहता हे केंद्रातील सत्ताधारी व्यवस्थेचे ‘राजकीय प्रतिनिधी’ म्हणून जाणीवपूर्वक सुनावणी लांबवत आहेत, असा निष्कर्ष उपलब्ध माहितीतून काढणे योग्य ठरणार नाही. ते केंद्र सरकारचे कायदा अधिकारी असले तरी या प्रकरणात ते उत्तर प्रदेश सरकारची बाजू मांडत आहेत. त्यामुळे आरोप आणि सिद्ध तथ्य यातील सीमारेषा स्पष्ट ठेवणे आवश्यक आहे.

### प्रश्न देणगीचा, पण विश्वासाचा अधिक

राम मंदिराच्या उभारणीशी आणि त्यासाठी जमा झालेल्या देणग्यांशी देशातील कोट्यवधी भाविकांच्या भावना जोडलेल्या आहेत. त्यामुळे देणग्यांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचा आरोप केवळ आर्थिक व्यवहारापुरता मर्यादित राहत नाही; तो विश्वास, पारदर्शकता आणि सार्वजनिक उत्तरदायित्वाचा प्रश्न बनतो.

याच कारणामुळे याचिकाकर्त्यांनी न्यायालयाच्या देखरेखीखाली ड्खढ चौकशीची मागणी केली आहे. या आरोपांमध्ये तथ्य आहे की नाही, हे तपास यंत्रणा आणि न्यायालयीन प्रक्रियेतूनच स्पष्ट होऊ शकते.

### १७ ऑगस्टकडे आता लक्ष

सुनावणी पुढे गेल्याने आरोप संपलेले नाहीत आणि सरकार दोषी ठरलेलेही नाही. उलट, आता १७ ऑगस्टची सुनावणी अधिक महत्त्वाची ठरणार आहे. सर्वोच्च न्यायालय या याचिकांवर पुढे काय भूमिका घेते, ड्खढ चौकशीची मागणी स्वीकारते का, विद्यमान तपासाबाबत सरकारकडून काय स्पष्टीकरण मागते आणि देणगी व्यवहारांच्या पारदर्शकतेबाबत कोणते प्रश्न उपस्थित होतात, याकडे लक्ष लागले आहे. सर्वात महत्त्वाचा प्रश्न मात्र राजकीय आहेन्यायालयीन प्रक्रियेतील प्रत्येक तहकूब केवळ प्रक्रियात्मक कारण म्हणून स्वीकारायची, की संवेदनशील राजकीय विषयांच्या बाबतीत त्याच्या ‘टायमिंग’वरही सार्वजनिक प्रश्न विचारायचे? लोकशाहीत न्यायालय स्वतंत्र आहे आणि सरकारला न्यायालयासमोर उत्तर द्यावे लागते. त्यामुळे या प्रकरणात कोणाच्याही हेतूबाबत निष्कर्ष काढण्यापेक्षा १७ ऑगस्टच्या सुनावणीत न्यायालयासमोर कोणती तथ्ये आणि कागदपत्रे येतात, हेच निर्णायक ठरणार आहे.

## संपादकीय

### CJIनाच विद्यार्थ्यांचा विरोध! न्यायव्यवस्थेवर अविश्वास की सत्तेच्या राजकारणाला धोक्याची घंटा?

NALSARच्या ४५० विद्यार्थ्यांचा सवाल छोटा नाही; प्रश्न एका व्यक्तीचा नसून संविधान, न्यायालय आणि सत्तेच्या समीकरणांचा आहे!

न्यायालयात न्याय मिळतो की नाही, हा प्रश्न सामान्य माणूस विचारतो तेव्हा त्याला अनेकदा 'प्रक्रिया सुरू आहे' असे सांगितले जाते. पण जेव्हा कायद्याचे विद्यार्थीच देशाच्या सरन्यायाधीशांच्या उपस्थितीवर प्रश्नचिन्ह उभे करतात, तेव्हा त्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून पुढे जाता येत नाही.

हैदराबादमधील NALSAR विद्यापीठातील ४५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीश सूर्यकांत यांना आगामी दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्याच्या निर्णयाला विरोध केला आहे.

हा केवळ एका निमंत्रणाचा वाद नाही. हा न्यायव्यवस्थेबद्दल तरुण पिढीच्या मनात निर्माण होत असलेल्या प्रश्नांचा राजकीय आणि घटनात्मक आरसा आहे. आणि म्हणूनच आता सरळ प्रश्न विचारला पाहिजे देशातील सर्वोच्च न्यायिक पदावर असलेल्या व्यक्तीला कायद्याचे विद्यार्थीच प्रश्न विचारत असतील, तर या अस्वस्थतेचे कारण काय? विद्यार्थी चुकीचे आहेत? की त्यांच्या प्रश्नांकडे पाहण्याची व्यवस्था तयार नाही? की प्रश्न विचारणारी नवी पिढीच आता कोणत्याही घटनात्मक पदाला 'अस्पृश्य' मानायला तयार नाही? यातील तिसरा पर्याय सत्तेला आणि संस्थांना सर्वाधिक अस्वस्थ करणारा ठरू शकतो. कारण आजचा विद्यार्थी कालचा मतदार नाही. तो संविधान वाचतो. तो न्यायालयीन निर्णय वाचतो. तो सुनावण्यांचे वृत्त पाहतो. तो पोलिस कारवाईचे व्हिडिओ पाहतो. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो प्रश्न विचारतो. जंतरमंतरपासून NALSARपर्यंत प्रश्नांची साखळी जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या कथित पोलिस कारवाईचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचला. २२ जुलै रोजी या प्रकरणाच्या तातडीच्या सुनावणीची मागणी झाली. आंदोलनातील पोलिस कारवाईचे व्हिडिओ न्यायालयासमोर दाखवण्याचा प्रयत्न झाला आणि त्यावेळी व्हिडिओ पाहण्यासाठी वेळ नसल्याच्या आशयाची टिप्पणी झाल्याचे वृत्त आले. आता कल्पना करा एखादा विद्यार्थी पोलिसांकडून मारहाण झाल्याचा आरोप करतो. तो पुरावा म्हणून व्हिडिओ घेऊन न्यायालयात जातो. आणि त्याला जर न्यायालयीन प्रक्रियेत तातडीची संवेदनशीलता जाणवली नाही, तर त्याच्या मनात प्रश्न निर्माण होणार नाहीत तर काय होणार? न्याय मागणाऱ्या विद्यार्थ्याला न्यायालयाच्या दारातच 'आमच्याकडे वेळ नाही' असा संदेश गेला तर न्यायव्यवस्थेवरील त्याचा विश्वास कसा टिकणार?

होय, नंतरच्या सुनावण्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने शांततापूर्ण आंदोलनाच्या अधिकाराबाबत महत्त्वाची भूमिका घेतली. पोलिसांकडून अतिरेक होऊ नये, असे निर्देश देण्यात आले. आंदोलनकर्त्यांच्या अधिकारांबाबत न्यायालयाने हस्तक्षेपही केला. पण प्रश्न हा आहे पहिल्या प्रतिक्रियेचा परिणाम काय झाला? कारण न्यायालयीन संस्थांमध्ये केवळ अंतिम आदेश महत्त्वाचा नसतो; न्याय मिळत असल्याची भावना निर्माण करणारी संपूर्ण प्रक्रिया महत्त्वाची असते. आता राजकीय प्रश्न टाळता येणार नाही या प्रकरणात थेट राजकीय कटाचा आरोप करण्यासाठी पुरावे आहेत, असे म्हणता येणार नाही. पण राजकीय प्रश्न विचारण्यास कोणतीही मनाई नाही. आज देशातील तरुण न्यायव्यवस्थेकडे कोणत्या नजरेने पाहत आहेत? घटनात्मक संस्थांवर त्यांचा विश्वास वाढतो आहे की कमी होतो आहे? आणि या अस्वस्थतेचा राजकीय फायदा कोण घेणार? कारण राजकारणात रिकामी जागा कधीच रिकामी राहत नाही. संस्थांवरचा विश्वास कमी झाला की राजकीय शक्ती त्या अविश्वासाला आपल्या सोयीच्या कथानकात बदलतात. एक गट म्हणतो न्यायालय सरकारच्या बाजूने आहे. दुसरा म्हणतो न्यायालय विरोधकांच्या बाजूने आहे. तिसरा म्हणतो न्यायव्यवस्था जनतेपासून दूर गेली आहे. आणि अशा आरोप-प्रत्यारोपांच्या वातावरणात सर्वाधिक नुकसान होते ते संस्थेच्या विश्वासार्हतेचे. सत्तेला सोयीचा प्रश्न कोणता? इथे राजकीय नेतृत्वालाही प्रश्न विचारला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थी आंदोलनाला 'राजकीय कट' म्हणणे सोपे आहे. प्रत्येक विरोधामागे एखादा पक्ष शोधणे सोपे आहे. प्रत्येक असहमतीला देशविरोधी ठरवणे त्याहून सोपे आहे. पण एकदा का तरुण पिढीला वाटू लागले की प्रश्न विचारला तर आम्हालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाईल, तर ही परिस्थिती कोणासाठीही चांगली नाही. कारण उद्या सत्ता बदलू शकते. आज ज्यांना आंदोलनकर्त्यांचा आवाज त्रासदायक वाटतो, ते उद्या विरोधात असू शकतात. आज ज्यांना न्यायालयावर टीका करणे सोयीचे वाटते, त्यांनाच उद्या न्यायालयाकडून संरक्षण मागावे लागू शकते. संविधान कोणत्याही पक्षाचे खासगी मालमत्ता नाही. न्यायालय कोणत्याही सरकारचे विभागीय कार्यालय नाही. आणि नागरिकांचा प्रश्न विचारण्याचा अधिकार कोणत्याही सत्तेची देणगी नाही. न्यायालयावर टीका म्हणजे न्यायव्यवस्थेविरोधात युद्ध नव्हे हा फरक जाणीवपूर्वक पुसण्याचा प्रयत्न झाला, तर लोकशाही धोक्यात येते. न्यायाधीशांच्या निर्णयावर टीका करणे म्हणजे न्यायालयाचा अवमान नाही. न्यायालयीन प्रक्रियेवर प्रश्न विचारणे म्हणजे न्यायव्यवस्थेचा नाश करणे नाही. आणि सरन्यायाधीशांच्या भूमिकेबद्दल असहमती व्यक्त करणे म्हणजे संविधानाचा अपमान नाही. उलट, संविधान नागरिकाला प्रश्न विचारण्याचा अधिकार देते. मग कायद्याचे विद्यार्थी हा अधिकार वापरत असतील तर त्यांच्याशी संवाद साधण्याऐवजी त्यांना 'न्यायव्यवस्थेविरोधी' ठरवायचे का? खरा धोका विद्यार्थ्यांच्या प्रश्नात नाही; प्रश्न दाबण्याच्या मानसिकतेत आहे लोकशाहीत असहमती असणारच. सरकारवर टीका होईल. संसदेवर टीका होईल. माध्यमांवर टीका होईल. न्यायालयावरही टीका होईल. प्रश्न असा नाही की टीका का होते. प्रश्न असा आहे की टीका झाल्यानंतर संस्था अधिक मजबूत होतात की अधिक असहिष्णू? NALSARमधील विद्यार्थ्यांचा विरोध हा त्यामुळे एका दीक्षांत समारंभाच्या प्रोटोकॉलपेक्षा मोठा विषय आहे. तो भविष्यातील वकिलांचा, न्यायाधीशांचा आणि संविधानिक संस्थांशी व्यवहार करणाऱ्या पिढीचा मानसिक नकाशा दाखवतो. ही पिढी प्रश्न विचारणार आहे. तिला केवळ आदेश नकोत. तिला स्पष्टीकरण हवे आहे. तिला संविधानातील अधिकार पुस्तकातच नाही, तर प्रत्यक्ष आयुष्यातही दिसायला हवेत. आजचा प्रश्न उगखंचा नाहीसंस्थेच्या विश्वासाचा आहे CJI सूर्यकांत व्यक्तिशः योग्य आहेत की अयोग्य, हा प्रश्न या अग्रलेखाचा केंद्रबिंदू नाही. कारण व्यक्ती येतात आणि जातात. पदांवर बदल होतात. पण संस्था टिकल्या पाहिजेत. आणि संस्था टिकण्यासाठी त्यांच्यावर प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांची गरज असते. म्हणून NALSARच्या विद्यार्थ्यांना एक प्रश्न विचारण्याआधी आपण स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे आपल्याला न्यायव्यवस्थेवर अंधविश्वास हवा आहे की संविधानावर आधारित विश्वास? अंधविश्वासाला प्रश्न नको असतात. लोकशाहीला प्रश्न हवेत. आणि शेवटी सर्वात अस्वस्थ करणारा प्रश्न जर ४५० हून अधिक कायद्याचे विद्यार्थी देशाच्या सरन्यायाधीशांच्या उपस्थितीवर प्रश्नचिन्ह उभे करत असतील, तर आपण त्यांना गप्प करण्याचा प्रयत्न करणार आहोत? की त्यांच्या प्रश्नांमुळे आपल्या संस्थांमध्ये कुठे तरी दुरावा निर्माण झाला आहे का, याचा आत्मपरीक्षण करणार आहोत? कारण लोकशाहीला सर्वात मोठा धोका विरोध करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून नसतो. धोका तेव्हा निर्माण होतो, जेव्हा समाजाला प्रश्न विचारण्याची सवयच उरत नाही. जेव्हा असहमतीला देशद्रोह म्हटले जाते. जेव्हा टीकेला अवमान म्हटले जाते. जेव्हा न्यायालयावर प्रश्न विचारणे पाप मानले जाते. आणि जेव्हा संविधानापेक्षा पद मोठे मानले जाते. तेव्हा लोकशाहीचा कणा वाकायला सुरुवात होते. म्हणून NALSARचा हा आवाज ऐकला पाहिजे. त्यांच्याशी सहमत होणे बंधनकारक नाही. त्यांच्या प्रत्येक आरोपाला सत्य मानणेही आवश्यक नाही. पण त्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे, हे मान्य करावेच लागेल. कारण शेवटी सरन्यायाधीश बदलतील. सरकारे बदलतील. पक्ष बदलतील. सत्ता बदलेल. पण संविधान राहिले पाहिजे. न्यायव्यवस्था राहिली पाहिजे. आणि त्याहून महत्त्वाचे न्यायव्यवस्थेलाही प्रश्न विचारण्याचे धाडस असलेली लोकशाही जिवंत राहिली पाहिजे. कारण न्यायालयाची प्रतिष्ठा प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे कमी होत नाही; त्या प्रश्नांना उत्तर देण्याची क्षमता हरवली, तरच ती प्रतिष्ठा धोक्यात येते.

# पिंपरी-चिंचवडच्या सुधारित डीपीला नागरिकांचा 'रेड सिग्नल'!

## ५६ हजार ७७९ हरकती; १७ आरक्षणे-प्रस्तावांवरच ३७ हजारांहून अधिक आक्षेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सुधारित विकास आराखड्याला (डीपी) नागरिकांनी जोरदार विरोध दर्शविला आहे. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप सुधारित डीपीवर तब्बल ५६ हजार ७७९ हरकती दाखल झाल्या आहेत. विशेष म्हणजे, त्यापैकी १७ आरक्षणे आणि प्रस्तावांवर तब्बल ३७ हजार ४७९ हरकती नोंदविण्यात आल्या आहेत. त्यामुळे शहराच्या भविष्यातील विकासाचे नियोजन करणाऱ्या या आराखड्यापुढे नागरिकांच्या आक्षेपांचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

रस्ते रुंदीकरण, कत्तलखाना, दफनभूमी, सार्वजनिक सुविधांसाठीची आरक्षणे तसेच पूररेषेशी संबंधित प्रस्तावांना नागरिकांचा सर्वाधिक विरोध असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होत आहे.

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून महापालिकेकडे हस्तांतरित झालेल्या क्षेत्राचा समावेश करून सुधारित डीपी तयार करण्यात आला. त्यावर १५ मे २०२५ ते १४ जुलै २०२५ या कालावधीत हरकती मागविण्यात आल्या होत्या. ६० दिवसांच्या या कालावधीत शहराच्या विविध भागांतून हजारो हरकती दाखल झाल्या.

**पिंपरीतील आरक्षणांवर सर्वाधिक आक्षेप**

पिंपरी परिसरातील विविध आरक्षणांवर सर्वाधिक हरकती आल्या आहेत. म्युनिसिपल पर्पज, पोलिस स्टेशन आणि बस टर्मिनस या आरक्षणांवर मिळून तब्बल ५ हजार ८३८ हरकती दाखल झाल्या आहेत.

तळवडे येथील घरजाई माता मंदिराजवळ प्रस्तावित २४ मीटर रुंदीच्या रस्त्यावर ४ हजार ४१८, तर चिखलीतील दफनभूमी आरक्षणावर ४ हजार ३१८ हरकती दाखल झाल्या आहेत. सांगवीतील दफनभूमीच्या आरक्षणावरही ४ हजार १२४ हरकती नोंदविण्यात आल्या आहेत.



**मोशीतील कत्तलखान्याला विरोध**

सुधारित डीपीतील मोशी येथील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षण वादाच्या केंद्रस्थानी आले आहे. या आरक्षणावर तब्बल २ हजार ७५४ हरकती दाखल झाल्या आहेत. किवळे येथील दफनभूमी आरक्षणावर २ हजार ४३५ हरकती नोंदविण्यात आल्या आहेत.

याशिवाय पिंपरीतील मैदान, प्रसूतिगृह, वाचनालय, माध्यमिक शाळा तसेच विविध सार्वजनिक सुविधांच्या आरक्षणांवरही नागरिकांनी मोठ्या संख्येने आक्षेप घेतले आहेत.

**रस्ते रुंदीकरणालाही 'नकार'**

सुधारित डीपीतील रस्ते रुंदीकरणाचे प्रस्तावही नागरिकांच्या रोषाचे केंद्र बनले आहेत. थेरगाव येथील २४ मीटर रस्त्याच्या प्रस्तावावर २ हजार ९३९, पिंपरीतील प्रस्तावित रस्त्यावर ८००, चिंचवडमधील २४ मीटर रस्त्यावर ७००, तर वाकडमधील १८ आणि २४ मीटर रस्त्यांच्या प्रस्तावावर ४९३ हरकती दाखल झाल्या आहेत.

चऱ्होलीतील स्टेडियम, घोरपडे पार्क, रहाटणीतील उद्यान विस्तार तसेच अन्य सार्वजनिक आरक्षणांवरही नागरिकांनी आक्षेप नोंदविले आहेत.

**महत्त्वाची आकडेवारी**

| | |
|---|---|
| * एकूण हरकती | : ५६,७७९ |
| * १७ आरक्षणे/प्रस्तावांवर | : ३७,४७९ हरकती |
| * मोशी कत्तलखाना | : २,७५४ हरकती |
| * चिखली दफनभूमी | : ४,३१८ |
| * सांगवी दफनभूमी | : ४,१२४ |
| * किवळे दफनभूमी | : २,४३५ |
| * तळवडे २४ मीटर रस्ता | : ४,४१८ |
| * थेरगाव २४ मीटर रस्ता | : २,९३९ |
| * सुनावणीला सुरुवात | : ३ ऑगस्ट २०२६ |

**वर्षभराच्या प्रतीक्षेनंतर सुनावणी**

हरकती दाखल झाल्यानंतर त्यांच्या सुनावणीसाठी नागरिकांना तब्बल वर्षभर प्रतीक्षा करावी लागली. अखेर ३ ऑगस्टपासून सुनावणी समितीसमोर हरकतींच्या सुनावणीला सुरुवात झाली आहे. हरकतदारांना आपली बाजू मांडण्याची संधी दिली जात आहे. मात्र, हजारोंच्या संख्येने हरकती दाखल झाल्या असतानाही प्रत्यक्ष सुनावणीसाठी उपस्थित राहणाऱ्या नागरिकांची संख्या तुलनेने कमी असल्याचे चित्र आहे. त्यामुळे केवळ हरकत दाखल करणे पुरेसे ठरणार की सुनावणीदरम्यान नागरिक आपली भूमिका ठामपणे मांडणार, हा प्रश्नही महत्त्वाचा ठरत आहे.

सुनावणी समिती सर्व हरकती आणि त्यामागील कारणांचा विचार करून पुढील निर्णय घेणार आहे. त्यामुळे ज्या आरक्षणांवर हजारोंच्या संख्येने हरकती दाखल झाल्या आहेत, त्यामध्ये बदल होणार का? रस्ते रुंदीकरणाचे प्रस्ताव कायम राहणार की त्यांचा फेरविचार होणार? मोशीतील कत्तलखाना आणि विविध दफनभूमींच्या आरक्षणांचे काय होणार? याकडे आता पिंपरी-चिंचवडकरांचे लक्ष लागले आहे.

# मोशी कचरा डेपो दुर्घटना : ४० लाखांची मदत जाहीर; पण मृत्यूला जबाबदार कोण?

## मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदतीचा दिलासा; मात्र दुर्घटनेमागील निष्काळजीपणावर ठोस कारवाई कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी । प्रतिनिधी मोशी कचरा डेपो येथे झालेल्या भीषण दुर्घटनेत कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यानंतर आता त्यांच्या कुटुंबीयांसाठी अँटोनी लारा रिन्युएबल्स कंपनीने एकूण ४० लाखांची आर्थिक मदत देण्याचे मान्य केले आहे. यासोबत मृत कर्मचाऱ्यांच्या मुलांचे शिक्षण, वैद्यकीय विमा आणि कुटुंबातील एका सदस्याला कायमस्वरूपी नोकरी देण्याची ग्वाही कंपनीकडून देण्यात आली आहे.

या मदतीची घोषणा पत्रकार परिषदेत सत्ताधारी पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी केली. यावेळी महापौर रवी लांडगे, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे उपस्थित होते.

**मदत मिळाली; पण जबाबदारीचे काय?**

दुर्घटनेनंतर पीडित कुटुंबांना आर्थिक मदत मिळणे आवश्यकच आहे. मात्र, पैशांची मदत म्हणजे दुर्घटनेची जबाबदारी संपली का? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

कचरा डेपोच्या कामकाजात सुरक्षा नियमांचे पालन झाले होते का? कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुरक्षाव्यवस्था उपलब्ध होती का? दुर्घटनेपूर्वी कोणत्याही त्रुटी प्रशासनाच्या किंवा संबंधित कंपनीच्या निदर्शनास आल्या होत्या का? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, या दुर्घटनेला नेमके कोण जबाबदार आहे?

या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मिळणे आवश्यक आहे.



**२० लाख तातडीने, २० लाख एफडीमध्ये**

महापालिकेच्या वतीने प्रत्येक मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला १० लाख, तर कंपनीच्या वतीने १० लाख, अशी एकूण २० लाखांची तातडीची मदत देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

कंपनीकडून उर्वरित २० लाखांची रक्कम येत्या काही दिवसांत बँकेत मुदत ठेव (Fixed Deposit) म्हणून जमा केली जाणार आहे.

याशिवाय महाराष्ट्र शासनाकडून प्रत्येक मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला स्वतंत्रपणे ५ लाखांची मदत देण्यात येणार आहे.

**घरकुलाची आश्वासने; कागदपत्रांचा अडथळा नको**

पीडित कुटुंबांना हक्काचे घर मिळावे यासाठी प्रशासनामार्फत 'घरकुल' योजनेच्या माध्यमातून निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले.

मात्र, कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी कोणत्याही कुटुंबाची मदत रखडू नये, यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

**मदतीसोबत चौकशी आणि कारवाईही हवी**

मृतांच्या कुटुंबांना आर्थिक मदत, मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी आणि कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देण्याचे आश्वासन निश्चितच महत्त्वाचे आहे. मात्र, या दुर्घटनेची कारणे शोधून भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी जबाबदारी निश्चित करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

मोशी कचरा डेपोतील दुर्घटना केवळ 'दुर्दैवी घटना' म्हणून विसरली जाणार की सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींची सखोल चौकशी होऊन दोषींवर कारवाई केली जाणार, हा आता खरा प्रश्न आहे.

मृतांच्या कुटुंबांना मदत मिळाली, पण त्यांच्या मृत्यूला न्याय कधी मिळणार? हा प्रश्न प्रशासन आणि संबंधित यंत्रणांसमोर कायम आहे.

# चार बिन पद्धतीने कचरा विलगीकरणाला गती; पिंपरी-चिंचवडमध्ये महापालिकेची जनजागृती मोहीम

## गृहभेटींमधून नागरिकांना प्रबोधन; ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीच्या कचऱ्याचे स्वतंत्र संकलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी : प्रतिनिधी

स्वच्छ सर्वेक्षण २०२६च्या पार्श्वभूमीवर शहरातील कचरा विलगीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात गृहभेटी देऊन नागरिकांना चार-बिन पद्धतीने कचरा विलगीकरण करण्याबाबत माहिती दिली जात आहे.

घरातून निर्माण होणारा ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीपूर्वक हाताळण्याचा कचरा स्वतंत्रपणे ठेवून संबंधित घंटागाडीमध्ये देण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे. तसेच कचरा उघड्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी टाकून अस्वच्छता निर्माण करू नये, याबाबतही नागरिकांचे प्रबोधन करण्यात येत आहे.

घरातूनच कचरा स्वतंत्र केला तर प्रक्रिया अधिक शास्त्रीय

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, कचरा व्यवस्थापनाच्या संपूर्ण प्रक्रियेत कचऱ्याचे विलगीकरण हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. घरातूनच कचरा स्वतंत्र केल्यास त्याची पुढील प्रक्रिया अधिक सुलभ आणि शास्त्रीय पद्धतीने करता येते. त्यामुळे नागरिकांनी चार-बिन पद्धतीचा अवलंब करून महापालिकेस सहकार्य करावे.

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले की, कचरा विलगीकरणाची सवय प्रत्येक कुटुंबात रुजणे आवश्यक आहे. त्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून जनजागृती करण्यात येत आहे. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण झाल्यास त्याचा पुनर्वापर आणि प्रक्रिया अधिक परिणामकारकपणे करता येईल. उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, गृहभेटीच्या माध्यमातून नागरिकांना चार प्रकारच्या कचऱ्याचे स्वतंत्र संकलन आणि घंटागाडीमध्ये कचरा देण्याची योग्य पद्धत समजावून सांगण्यात येत आहे. 'आपला कचरा, आपली जबाबदारी' या भावनेतून नागरिकांनी कचरा विलगीकरणाला प्राधान्य द्यावे. महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावर ही मोहीम राबविण्यात येत असून, कचरा विलगीकरणाबाबत नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर प्रशासनाचा भर आहे. शहर स्वच्छ आणि कचरामुक्त ठेवण्यासाठी नागरिकांनी कचरा विलगीकरणाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# आळंदी: भाजी विक्रेत्याकडे ५ हजारांच्या हप्त्याची मागणी; वृद्धाला मारहाण व जीवे मारण्याची धमकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी : प्रतिनिधी

घटनास्थळ: ज्ञानसागर मंगल कार्यालयाजवळ, वडगाव रोड, आळंदी.

गुन्हा: आळंदी पोलीस ठाणे (इछ्ड कलम ३०८(३), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५))

सविस्तर वृत्त: वडगाव रोडवर भाजीपाल्याची गाडी लावून व्यवसाय करणाऱ्या ६० वर्षीय वृद्ध विक्रेत्याकडे (सिद्धार्थ डवडे) आरोपी हरिओम गणेश पांचाळ व त्याच्या एका साथीदाराने दरमहा ५,००० रुपयांच्या हप्त्याची (खंडणी) मागणी केली. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिला असता आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व दगडाने मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. पोलीस पुढील तपास करत आहेत.

**आळंदी: बँकेत बनावट कागदपत्रांच्या आधारे ४ नागरिकांची ५ लाखांहून अधिक फसवणूक**

घटनास्थळ: राजगुरु सहकारी बँक लि., शाखा आळंदी.

गुन्हा: आळंदी पोलीस ठाणे (इछ्ड कलम ११२(२), ६१(२), ३१८(४), ३(५) व भादंवि ४२०, ३४)

सविस्तर वृत्त: आळंदी येथील राजगुरू बँकेत बनावट कागदपत्रे व परस्पर नावे वापरून आरोपी किरण बाबासाहेब पाळवदे (वय २३, रा. देहू फाटा) व त्याच्या साथीदारांनी ४ नागरिकांच्या खात्यावरून तब्बल ५,००,५०/- रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. पोलीस शिपाई अविनाश सोळंके यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे.

**भोसरी एमआयडीसी: स्पाइन रोडवर भरधाव टेम्पोच्या धडकेत बुलेटस्वार गंभीर जखमी**

घटनास्थळ: स्पाइन रोड, संतनगर चौक, मोशी.



गुन्हा: भोसरी एमआयडीसी पोलीस ठाणे (इछ्ड कलम २८१, १२५ (ब), ३२४(४) व मोटार वाहन कायदा)

सविस्तर वृत्त: स्पाइन रोडवरून मित्राच्या बुलेटवरून जात असलेल्या ओमकार कांगळे (वय २८) या तरुणाच्या दुचाकीला आरोपी टेम्पो चालक पांडुरंग नामदेव डिगोळे (वय ३७, रा. शिक्रापूर) याने हयगयीने व निष्काळजीपणाने गाडी चालवून जोरात धडक दिली. या अपघातात फिर्यादीचा पाय फ्रॅक्चर होऊन ते गंभीर जखमी झाले असून वाहनाचेही मोठे नुकसान झाले आहे.

**पिंपरी: कपड्याच्या दुकानात काम करणाऱ्या सेल्समननेच चोरले २८ हजारांचे शर्ट**

घटनास्थळ: प्रगती ड्रेसेस एन एक्स, कपडा बाजार, पिंपरी.

गुन्हा: पिंपरी पोलीस ठाणे (इछ्ड कलम ३०६, भादंवि कलम ३८१)

सविस्तर वृत्त: पिंपरी येथील कपडा बाजारातील 'प्रगती ड्रेसेस' या दुकानात काम करणाऱ्या सेल्समन आरोपी राजेश नंदलाल लुंडवानी (वय ४७) याने बनावट (डुप्लिकेट) चाबीच्या साहाय्याने दुकानाचे कुलूप उघडून आत प्रवेश केला. दुकानातील २८,००० रुपये किमतीचे नवीन शर्ट चोरून नेल्याप्रकरणी दुकान मालकाच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### उरुळी कांचन पोलीस ठाण्यातील 'हाय-व्होल्टेज' राड्यानंतर मोठी कारवाई; दोन्ही गटांवर गुन्हे दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

उरुळी कांचन (पुणे) : प्रतिनिधी

उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या आवारातच महिलांच्या दोन गटांत झालेल्या तुफान राड्याप्रकरणी पोलिसांनी अखेर कडक पाऊल उचलले आहे. पोलीस ठाण्यासारख्या संवेदनशील ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणल्याबद्दल पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या व्यक्तींवर शासकीय कामात अडथळा आणणे आणि शांतता भंग केल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत.नेमकी कारवाई आणि घडामोडी:दोन्ही गटांवर गुन्हे: पोलीस ठाण्यात गोंधळ घालणाऱ्या दोन्ही बाजूच्या महिला आणि त्यांच्या समर्थकांवर कायदेशीर गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. सावकारी प्रकरणाचा तपास सुरू: मूळ फिर्यादीच्या तक्रारीवरून बेकायदेशीर सावकारी आणि खंडणीसदृश छळवणुकीचा गुन्हा स्वतंत्रपणे तपासला जात आहे. ३ लाख १४ हजारांच्या बदल्यात १० लाखांहून अधिक रक्कम वसूल केल्याचा आरोप सावकारावर आहे.सीसीटीव्ही आणि व्हिडिओ तपासणी: पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक (SP) संदीपसिंह गिल यांच्या आदेशानंतर, घटनेचे व्हायरल व्हिडिओ आणि पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेऊन हुज्जत घालणाऱ्या इतर संशयितांची ओळख पटवली जात आहे.

# पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेसाठी भाजपचा पाठपुरावा; कोल्हेंच्या निष्क्रियतेमुळे प्रकल्प दुसरीकडे गेल्याचा कराळेंचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेचा मार्ग आंबेगाव, खेड आणि जुन्नर परिसरातूनच जावा, अशी भाजपची भूमिका असून, त्यासाठी राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून प्रभावी पाठपुरावा केला जाईल, अशी माहिती भाजपचे जिल्हा महामंत्री डॉ. ताराचंद कराळे यांनी दिली. दरम्यान, विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या कथित निष्क्रियतेमुळे रेल्वेचा मार्ग या भागातून दुसरीकडे वळल्याचा आरोपही त्यांनी केला.

मंचर येथे आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. कराळे बोलत होते. ते म्हणाले, पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे या भागातून गेल्यास शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी तसेच व्यावसायिकांना मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे या भागातून रेल्वे नेण्यासाठी भाजप आग्रही आहे.

राज्य सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची याबाबतची भूमिका स्पष्ट असून, मुख्यमंत्र्यांनी डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर रेल्वे मार्गाबाबतचे चित्र अधिक स्पष्ट होईल. त्यानंतर केंद्र सरकारच्या पातळीवर भाजपकडून योग्य तो पाठपुरावा करण्यात येईल, असे कराळे यांनी सांगितले.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील आणि आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन या प्रश्नावर तोडगा काढण्याचा



प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**'प्रशासकीय पातळीवरील पाठपुरावा महत्त्वाचा'**

२०१९ पर्यंत पुणे-नाशिक रेल्वेसाठी चांगला पाठपुरावा झाला होता. विशेषतः माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी या प्रकल्पासाठी विशेष प्रयत्न केले. मात्र, त्यानंतर विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी अपेक्षित प्रशासकीय पाठपुरावा न केल्यामुळे रेल्वे प्रकल्पाला ब्रेक लागल्याचा आरोप कराळे यांनी केला.

केवळ संसदेत प्रश्न मांडून उपयोग होत नाही, तर प्रशासकीय पातळीवर सातत्याने पाठपुरावा करणेही महत्त्वाचे असते, असे सांगत कराळे यांनी डॉ. कोल्हे यांच्यावर टीका केली. रेल्वेचा मार्ग दुसरीकडे जाण्यासाठी केवळ डॉ. कोल्हेच जबाबदार असल्याचा आरोपही त्यांनी केला.

यापुढील काळात पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे या भागातूनच जाण्यासाठी भाजप जाणीवपूर्वक प्रयत्न करणार असल्याचे कराळे यांनी सांगितले. भाजप उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद बाणखेले यांनी यापूर्वीच रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन निवेदन सादवत रेल्वे मार्गाबाबत पाठपुरावा केल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी भाजप उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद बाणखेले, जिल्हा उपाध्यक्ष अरविंद वळसे पाटील, कायदा आघाडीचे ॲड. श्रीराम बांगर, संदीप बाणखेले, स्वप्ना खामकर, बाबू थोरात आदी उपस्थित होते.

## 'आरएसएस चले जाव, भाजप चले जाव'; पुण्यात क्रांती दिनी आंदोलकांचा जोरदार घोषणाबाजीने एल्गार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

९ ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून पुण्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात आयोजित आंदोलनात 'आरएसएस चले जाव, भाजप चले जाव' अशा तीव्र घोषणा देण्यात आल्या. 'जवाब दो – लोकशाही-संवैधानिक हक्कांसाठी मोहीम' या अंतर्गत विविध सामाजिक आणि लोकशाहीवादी संघटनांनी एकत्र येत केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात हे आंदोलन छेडले होते.

या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेत 'शहा, मोदी, फडणवीस राजीनामा द्या' आणि 'भाजप हटाव, देश वाचवा' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. देशातील वाढती बेरोजगारी, महागाई, शिक्षण व आरोग्याचे खाजगीकरण, तसेच शेतकरी आणि कामगार विरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात मेधा थत्ते, विनया मालती हरी, सीमा काकडे, मिलिंद चव्हाण यांसह अनेक प्रमुख सामाजिक कार्यकर्ते आणि संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## फुलांचे भाव घसरले; फूल उत्पादक शेतकरी चिंतेत
## दहा किलोला अवघा ५० ते ६० रुपये दर; उत्पादन खर्चही निघेना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, लाखणगाव, जारकरवाडी, पोंदेवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात विविध जातींच्या फुलांची लागवड केली जाते. सध्या फुलांच्या बागांमध्ये तोडणीचा हंगाम सुरू झाला असून, बाजारभावात मोठी घसरण झाल्याने फूल उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

सध्या फुलांना दहा किलोमागे अवघा ५० ते ६० रुपये बाजारभाव मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. मागील आठवड्यात झालेल्या सततच्या पावसामुळे तयार झालेली अनेक फुले झाडावरच सडून गेली. आता पावसाने काहीशी विश्रांती



घेतली असली, तरी बाजारभाव कोसळल्याने शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे राहिले आहे.

फुलांची तोडणी करण्यासाठी मजुरांना दररोज २०० ते ३०० रुपये मजुरी द्यावी लागते. त्यात वाहतूक खर्च, खत, औषधे, मशागत आणि इतर उत्पादन खर्चाची भर पडत आहे. मात्र, सध्या मिळणाऱ्या दरातून उत्पादन खर्चही भरून निघत नसल्याने फूल उत्पादक शेतकऱ्यांचा आर्थिक ताळमेळ बिघडला आहे.

सध्या फुलांच्या बागा जोमात असून उत्पादन मोठ्या प्रमाणात येत आहे. मात्र, त्याच वेळी बाजारभावात झालेली घसरण शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय ठरली आहे. 'फुले बहरली, पण भाव कोमेजले' अशी परिस्थिती फूल उत्पादक शेतकऱ्यांवर आली आहे.

दरम्यान, बाजारात प्लास्टिकच्या फुलांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असल्याने त्याचा परिणाम नैसर्गिक फुलांच्या मागणीवर होत असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. प्लास्टिकच्या फुलांवर शासनाने बंदी घालावी, अशी मागणी जारकरवाडी येथील बढेकरमळ्यातील फूल उत्पादक शेतकरी मच्छिंद्र बढेकर आणि सुरेश बढेकर यांनी केली आहे.

फुलांना योग्य बाजारभाव मिळावा तसेच उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतकऱ्यांना परवडणारा दर मिळण्यासाठी शासनाने बाजारपेठेतील परिस्थितीकडे लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी फूल उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे.

# ज्ञानेश्वर महाराज मंदिरात संत नामदेव महाराजांचा समाधी सोहळा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

आळंदी / प्रतिनिधी :

श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात संत नामदेव महाराज यांचा समाधी सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांनी आणि हरिनामाच्या जयघोषात भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला.

माऊली मंदिरात सर्व संतांचे समाधी सोहळे व पुण्यतिथी उत्सव सर्व समाजाने एकत्र येऊन साजरे करण्याच्या उपक्रमांतर्गत संत नामदेव महाराजांचा समाधी सोहळा आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त संत नामदेव महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन माऊली मंदिराचे चोपदार राजाभाऊ रंधवे आणि सोहळ्याचे संयोजक मोहन महाराज शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नामजयघोष व पंचपदीचे आयोजन करण्यात आले.

समाधी सोहळ्यानिमित्त रामचंद्र महाराज सारंग यांच्या सुश्राव्य वाणीतून कीर्तनसेवा झाली. 'ऐसा भाग्य झालो, तरी धन्य जन्मा आलो' या अभंगावर त्यांनी हृदयस्पर्शी



निरूपण केले. संत नामदेव महाराजांच्या जीवनचरित्रासह संत साहित्यामधील विविध दाखले देत त्यांनी उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले.

संत नामदेव महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या सहवासाचा तसेच त्यांच्या पंजाब प्रांतातील आध्यात्मिक कार्याचा उल्लेख यावेळी करण्यात आला. संत नामदेव महाराजांनी माऊलींसमवेत पंजाबपर्यंत वारकरी संप्रदायाची पताका पोहोचवत नामसंकीर्तनाचा प्रसार केला, असे कीर्तनातून सांगण्यात आले.

कीर्तनाला श्रीरामकृष्ण आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्थेतील मृदुंगमणी साहिल उत्तेकर व सिद्धार्थ राजणे या बाल वारकरी कलाकारांनी साथसंगत केली. गायक अक्षय महाराज कडू, दुर्वेश वैद्य तसेच संस्थेतील आध्यात्मिक शिक्षण घेणाऱ्या वारकरी विद्यार्थ्यांनी गायनाची साथ दिली.

श्रीरामकृष्ण आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने वर्षभर विविध संतांचे समाधी दिन व पुण्यतिथी सोहळे साजरे केले जात आहेत. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना संतपरंपरेची माहिती मिळण्याबरोबरच नवोदित कीर्तनकारांना कीर्तनसेवेची संधी मिळत आहे.

दरम्यान, संत नामदेव महाराजांच्या समाधी सोहळ्यानिमित्त संस्थेतील ज्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी संपूर्ण हरिपाठ पाठ केला आहे, अशा विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने सुमारे साडेतीन हजार रुपये किमतीच्या अमेरिकन स्कूल बॅग भेट देण्यात आल्या.

या प्रसंगी माऊली मंदिराचे चोपदार राजाभाऊ रंधवे, श्रीरामकृष्ण आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मोहन महाराज शिंदे, रवींद्र महाराज कुमकर, सुशीला शिंदे, अक्षय कडू तसेच राजगड तालुक्यातील वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोहळ्याची सांगता संत नामदेव महाराजांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करून 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल'च्या जयघोषात करण्यात आली. यानंतर श्री संत ज्ञानेश्वर महाराज भक्तनिवासात भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

## आळंदीत भाजी विक्रेत्याकडे ५ हजार रुपयांची खंडणी मागत लाथाबुक्क्यांनी आणि दगडाने बेदम मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

आळंदी । प्रतिनिधी

दरमहा पाच हजार रुपयांचा हप्ता देण्याची मागणी करत भाजी विक्रेत्याला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी तसेच दगडाने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना आळंदीतील वडगाव रोड परिसरात घडली आहे. याप्रकरणी आळंदी पोलिसांनी दोघांविरुद्ध खंडणीसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

भाजी विक्रीच्या गाड्यावर येऊन धमकावलेपोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्धार्थ भीमराव डबडे (वय ६०, रा. वडगाव रोड, आळंदी) हे ज्ञानसागर मंगल कार्यालयाजवळ भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करतात. दि. ८ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठच्या सुमारास हरिओम गणेश पांचाळ आणि त्याच्यासोबतचा एक अनोळखी व्यक्ती डबडे यांच्या भाजीपाला गाड्यावर आले.पैसे देण्यास नकार दिल्याने जीवघेणा हल्लाया दोघांनी डबडे यांच्याकडे दरमहा पाच हजार रुपये हप्ता म्हणून मागितले. डबडे यांनी पैसे देण्यास नकार दिला. याचा राग आल्याने आरोपींनी त्यांना घाणेरडी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात



केली. एवढ्यावरच न थांबता बाजूला पडलेल्या दगडाने मारहाण करून त्यांना गंभीर जखमी केले. 'जर हप्ता दिला नाही तर जीवनातून उठवू' अशी जीवे मारण्याची धमकीही आरोपींनी दिली असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. आळंदी पोलिसांत गुन्हा दाखलया गंभीर प्रकारानंतर दि. ९ ऑगस्ट रोजी आळंदी पोलीस ठाण्यात आरोपींवर भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०८(३), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दुधमल करत आहेत.

# बार्टी अधिछात्रवृत्तीवर विद्यार्थ्यांचा एल्गार; ६०० जागा आणि वयोमर्यादा रद्दची मागणी

## १२ ऑगस्टच्या बैठकीत निर्णयाची अपेक्षा; मागण्या मान्य न झाल्यास १९ ऑगस्टपासून पुण्यात बेमुदत धरणे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात बार्टी अंतर्गत पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या अधिछात्रवृत्तीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. बार्टी अधिछात्रवृत्तीच्या (BANRF) जागांची संख्या केवळ १०० ठेवण्यास आणि ३५ वर्षांची वयोमर्यादा लागू करण्यास संशोधक विद्यार्थ्यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. या मागण्यांसाठी नव्याने स्थापन झालेल्या 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन'च्या शिष्टमंडळाने समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

विद्यार्थ्यांनी BANRFÀया जागा १०० वरून किमान ६०० कराव्यात आणि संशोधक विद्यार्थ्यांवर लादलेली ३५ वर्षांची वयोमर्यादेची अट पूर्णपणे रद्द करावी, अशी प्रमुख मागणी केली. या मागण्यांबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत पुढील निर्णयासाठी १२ ऑगस्ट २०२६ रोजी बार्टीच्या निबंधकांसोबत विशेष बैठक आयोजित केली आहे.

**'१०० जागा पुरेशा कशा?'**

पीएच.डी.सारख्या दीर्घकालीन संशोधन अभ्यासक्रमासाठी इच्छुक विद्यार्थ्यांची संख्या मोठी असताना अधिछात्रवृत्तीच्या केवळ १०० जागा ठेवणे अन्यायकारक असल्याचा विद्यार्थ्यांचा दावा आहे. विशेषतः मागासवर्गीय विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आर्थिक आधार देणे हा बार्टीच्या उद्दिष्टांपैकी महत्त्वाचा भाग असताना उपलब्ध जागांची मर्यादा संशोधनाच्या संधींवर परिणाम करणारी ठरू शकते, असा विद्यार्थ्यांचा युक्तिवाद आहे.

त्यामुळे जागांची संख्या किमान ६००पर्यंत वाढविण्याची मागणी करण्यात आली आहे.

**३५ वर्षांची अट का वादात?**

वयोमर्यादेचा मुद्दाही विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा केंद्रबिंदू ठरला आहे. संशोधनाची सुरुवात करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याचा शैक्षणिक प्रवास आणि सामाजिक-आर्थिक परिस्थिती समान नसते. त्यामुळे ३५ वर्षांची जाचक अट अनेक पात्र विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या संधीपासून दूर ठेवू शकते, असा आक्षेप विद्यार्थ्यांनी घेतला आहे.

आयुष्यातील विविध टप्प्यांवर शिक्षण आणि संशोधनाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अशी मर्यादा कितपत योग्य आहे, असा सवालही संघटनेने उपस्थित केला आहे.

**१२ ऑगस्टची बैठक निर्णायक**

समाजकल्याण आयुक्तांसोबत झालेल्या चर्चेनंतर या प्रश्नावर पुढील निर्णय घेण्यासाठी बार्टीच्या निबंधकांसोबत १२ ऑगस्टला विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची ठरणार आहे.

या चर्चेत 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन'च्या वतीने राहुल डंबाळे, राहुल ससाने, अक्षय कांबळे, सिद्धार्थ ओव्हाळ, सुरेखा मेश्राम, प्रथमेश सूर्यवंशी आणि नितीन आंधळे यांनी सहभाग घेत विद्यार्थ्यांची



भूमिका प्रशासनासमोर मांडली.

**मागण्या मान्य न झाल्यास थेट आंदोलन**

दरम्यान, १२ ऑगस्टच्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर ठोस आणि सकारात्मक निर्णय न झाल्यास १९ ऑगस्ट २०२६पासून पुण्यातील समाजकल्याण आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

या आंदोलनात महाराष्ट्रातील मागासवर्गीय संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

आता प्रशासनासमोर दोन प्रमुख मागण्यांचे आव्हान आहेइअछठऋच्या जागा १०० वरून ६०० करणे आणि ३५ वर्षांची वयोमर्यादा रद्द करणे. १२ ऑगस्टच्या बैठकीत प्रशासन या मागण्यांवर काय भूमिका घेते, यावर पुढील आंदोलनाची दिशा ठरणार आहे.

## सारांश वृत्त

### एफएल-३ परवाना मंजुरीसाठी २० लाखांची लाच मागितल्याचा आरोप; उत्पादन शुल्क विभागाचा निरीक्षक अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

एफएल-३ परवाना मिळवून देण्यासह मायक्रो ब्रुअरीची फाईल मंजूर करण्यासाठी तब्बल २० लाख रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपावरून राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. जितेंद्र हरिश्चंद्र पाटील (वय ४७) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

याप्रकरणी एका ३७ वर्षीय लायसन्स कन्सल्टंटने एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, आरोपी पाटील यांनी एका फर्मला एफएल-३ परवाना मिळवून देण्यासाठी १२ लाख रुपये, तर संबंधित फर्मची मायक्रो ब्रुअरीची फाईल मंजूर करण्यासाठी ८ लाख रुपये, अशी एकूण २० लाख रुपयांची लाच मागितली होती.

तक्रारीची पडताळणी एसीबीकडून करण्यात आली. या पडताळणीदरम्यान १३ एप्रिल, २१ मे आणि २२ मे २०२६ रोजी आरोपीने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याचे विभागाने नमूद केले आहे. त्यानंतर तक्रारदाराकडे २२ लाख रुपयांची लाच मागून तडजोडीअंती ११ लाख रुपये स्वीकारण्याचे मान्य केल्याचे तपासात समोर आले.

या प्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ मधील कलम ७ अन्वये गुन्हा क्रमांक ३१८/२०२६ दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा १० ऑगस्ट रोजी दुपारी ३.४४ वाजता दाखल करण्यात आला. यानंतर आरोपी जितेंद्र पाटील याला १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.१० वाजता अटक करण्यात आली. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक सतिश वाळके यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

लाच मागणाऱ्या सरकारी अधिकारी अथवा कर्मचाऱ्याविरोधात तक्रार असल्यास एसीबीशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हा हवामानाचा धक्का नव्हता? एअर इंडियाचे विमान अचानक ३०० फूट खाली घसरले; नियंत्रण यंत्रणेत एकाच मिनिटात नऊ बिघाड!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

फुकेतहून दिल्लीकडे येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला ४ ऑगस्ट रोजी आलेली घटना केवळ हवामानातील अस्थिरतेमुळे झाल्याचे सुरुवातीचे स्पष्टीकरण आता गंभीर प्रश्नांच्या भोवऱ्यात सापडले आहे. फुकेतहून सकाळी ६.५६ वाजता उड्डाण केलेल्या एअर इंडियाच्या एआय २३७९ या विमानाने सुमारे अडीच तासांचा प्रवास पूर्ण केला असताना सकाळी ९.३२ वाजता विमानाच्या द्रवदाबावर चालणाऱ्या यंत्रणा आणि उड्डाण नियंत्रण यंत्रणेत एकामागून एक तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेदरम्यान विमानाची उंची अचानक सुमारे ३०० फूटांनी कमी झाली, तर विमानातील १७ प्रवासी जखमी झाले. सुरुवातीला ही घटना हवामानातील तीव्र हालचालीमुळे घडल्याचे सांगण्यात आले होते. मात्र आता समोर येत असलेल्या तांत्रिक माहितीनुसार, विमानाला हवेतच गंभीर स्वरूपाच्या यांत्रिक आणि नियंत्रणाशी संबंधित अडचणींचा सामना करावा लागला असण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अवघ्या एका मिनिटात तब्बल नऊ तांत्रिक त्रुटी नोंदवल्या गेल्याचे समोर येत आहे. यामध्ये विमान स्वतःहून नियंत्रित ठेवणारी यंत्रणा अचानक बंद होणे, द्रवदाबावर चालणाऱ्या यंत्रणांमध्ये बिघाड होणे आणि विमानाचे पुढील टोक वर किंवा खाली करण्याचे नियंत्रण करणाऱ्या यंत्रणांमध्ये त्रुटी निर्माण होणे यांचा समावेश आहे. विमान हवेत असताना अशा प्रकारे अनेक महत्त्वाच्या यंत्रणांमध्ये एकाच वेळी बिघाड होणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जाते. कारण विमानाची उंची, दिशा आणि स्थैर्य नियंत्रित ठेवण्यासाठी या यंत्रणा अत्यंत महत्त्वाच्या असतात. वशेष म्हणजे, या घटनेबाबत एअर इंडियाने विमान निर्माता कंपनी एअरबसशी संपर्क साधून तांत्रिक माहिती दिल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे आता या घटनेची खरी कारणे शोधण्यासाठी विमानाच्या प्रत्येक तांत्रिक यंत्रणेची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे.

सर्वात मोठा प्रश्न मात्र हाच आहे जर विमानात तांत्रिक बिघाडांची मालिका सुरू झाली होती, तर सुरुवातीला ही घटना केवळ हवामानातील अस्थिरतेमुळे झाल्याचे का सांगण्यात आले?

विमान अचानक ३०० फूट खाली घसरते, १७ प्रवासी जखमी होतात आणि त्याच काळात विमानाच्या नियंत्रणाशी संबंधित अनेक यंत्रणांमध्ये बिघाड होतो तर ही बाब केवळ सामान्य हवामानातील धक्का म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही.

आता विमान प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने काही प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मिळणे गरजेचे आहे. बिघाड नेमका कुठे झाला? देखभालीमध्ये काही त्रुटी होती का? विमानाच्या नियंत्रण यंत्रणेत आधीपासून काही समस्या होती का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अशाच प्रकारची घटना पुन्हा घडू नये यासाठी नेमकी कोणती पावले उचलली जाणार आहेत?

कारण विमान हवेत असताना काही सेकंदांचाही तांत्रिक बिघाड जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे एआय २३७९ विमानाची ही घटना केवळ एक अपघाती प्रसंग म्हणून नव्हे, तर विमान सुरक्षेसाठी दिलेला गंभीर इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे.

## खासदार बारणेंना पंतप्रधान मोदींचा मोलाचा सल्ला; विकासकामांचा अहवाल 'ई-बुक' स्वरूपात सोशल मीडियावर करा प्रसिद्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी सोमवारी नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.

या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी खासदार बारणे यांना मतदारसंघातील विकासकामे जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी डिजिटल आणि आधुनिक संपर्क माध्यमांचा प्रभावी वापर करण्याचा महत्त्वपूर्ण सल्ला दिला.'ई-बुक'द्वारे डिजिटल प्रसिद्धी कराखासदार बारणे यांनी आपल्या मतदारसंघातील विकासकामांचा १२ वा वार्षिक अहवाल पंतप्रधानांना सादर केला. हा अहवाल स्वीकारताना पंतप्रधानांनी या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच हा संपूर्ण अहवाल पारंपरिक पद्धतीऐवजी 'ई-बुक' (E-book) स्वरूपात तयार करून तो सोशल मीडियावर प्रसिद्ध करावा, जेणेकरून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत ही माहिती सहज आणि गतीने पोहोचू शकेल,

असे पंतप्रधानांनी स्पष्ट केले.२६ लाख जनतेशी जोडण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची गरजमावळ लोकसभा मतदारसंघाची लोकसंख्या सुमारे २६ लाख एवढी मोठी आहे. एवढ्या मोठ्या मतदारसंघात प्रत्येक नागरिकाशी थेट संपर्क ठेवणे लोकप्रतिनिधीला कठीण जाते. अशा वेळी सोशल मीडिया आणि कार्यकर्त्यांच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजना आणि झालेली विकासकामे जनतेपर्यंत सुलभतेने पोहोचवता येतात. त्यामुळे डिजिटल आणि आधुनिक संपर्क माध्यमे या कामात अत्यंत प्रभावी ठरतात, असे प्रतिपादन पंतप्रधान मोदी यांनी या बैठकीत केले.

## मराठा आरक्षणाची सुनावणी अंतिम टप्प्यात अन् न्यायमूर्तींची बदली! हा निव्वळ प्रशासकीय निर्णय की 'टायमिंग'मागे काही मोठी राजकीय खेळी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी निर्णायक टप्प्यात पोहोचलेली असतानाच न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या कोलकाता उच्च न्यायालयात बदलीची शिफारस झाल्याची बातमी समोर आली आहे. त्यामुळे आधीच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मराठा आरक्षणाच्या सुनावणीवर पुन्हा विलंबाची शक्यता निर्माण झाली आहे.

यामुळे सर्वात मोठा प्रश्न निर्माण होतो तो 'टायमिंग'चा.

आरक्षणाचा प्रश्न महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत संवेदनशील विषय आहे. मराठा समाजाची अपेक्षा, राज्य सरकारची भूमिका, न्यायालयीन कसोटी आणि आगामी राजकीय समीकरणे या सगळ्यांच्या केंद्रस्थानी हा मुद्दा आहे. अशा वेळी सुनावणीच्या अंतिम टप्प्यात संबंधित न्यायमूर्तींच्या बदलीची शिफारस होणे अनेकांच्या भुवया उंचावणारे ठरले आहे.

मात्र, बदलीची शिफारस झाली म्हणजे त्यामागे राजकीय दबाव आहे, असा थेट निष्कर्ष काढता येणार नाही. उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींच्या बदल्यांची प्रक्रिया ही घटनात्मक आणि न्यायिक यंत्रणेमधून होते. त्यामुळे या निर्णयामागील अधिकृत कारण काय आहे, हे स्पष्ट होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पण प्रश्न तरीही कायम राहतो मराठा आरक्षणाच्या सुनावणीचा अंतिम टप्पा सुरू असतानाच ही घडामोड का? सुनावणी पुन्हा नव्या खंडपीठासमोर गेल्यास आधी झालेल्या युक्तिवादाचा, कागदपत्रांचा आणि न्यायालयीन प्रक्रियेचा किती भाग पुन्हा घ्यावा लागेल? निर्णय आणखी किती काळ पुढे ढकलला जाईल? आणि या विलंबाचा राजकीय फायदा नेमका कोणाला होणार?

हे प्रश्न केवळ मराठा समाजासाठीच नाही, तर राज्यातील संपूर्ण राजकीय व्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहेत.

विशेषतः आगामी निवडणुका, आरक्षणाचा राजकीय वापर आणि विविध समाजघटकांमधील वाढती अस्वस्थता लक्षात घेता या बदलीकडे केवळ 'रुटीन ट्रान्सफर' म्हणून पाहून चालणार नाही. बदलीमागील अधिकृत कारण, निर्णयाची वेळ आणि सुनावणीवर होणारा प्रत्यक्ष परिणाम या तिन्ही बाबी पारदर्शकपणे समोर येणे आवश्यक आहे.

## श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टतर्फे पिंपरी-चिंचवडमधील विजेत्या गणेश मंडळांना १४ लाख २० हजारांची पारितोषिके जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टतर्फे पिंपरी-चिंचवडमधील विजेत्या गणेश मंडळांना १४ लाख २० हजारांची पारितोषिके जाहीर करण्यात आली असून, भोसरीच्या कै. दामूशेठ गव्हाणे मित्र मंडळाला ५१ हजारांचे प्रथम पारितोषिक मिळाले आहे.पुणे / पिंपरी-चिंचवड:श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने आयोजित 'राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा २०२५-२६' मधील पिंपरी-चिंचवड शहर महानगरपालिका विभागाचा निकाल आणि पारितोषिक वितरण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

मॅक्स मंथन डेली न्यूजचे पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी लक्ष्मण प्रधान यांनी दिलेल्या वृत्तानुसार, हा सोहळा १० ऑगस्ट २०२६ रोजी संपन्न झाला.या राष्ट्रीय स्पर्धेत पिंपरी-चिंचवड शहरातील २१५ गणेश मंडळे, १४ शाळा आणि २५ गृहनिर्माण सोसायट्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. या सर्वांमधून समाजप्रबोधनात्मक आणि गुणवंत देखावे सादर करणाऱ्या १२३ गणेश मंडळांसह शाळा व सोसायट्यांची निवड करण्यात आली.

विजेत्यांना एकूण १४ लाख २० हजार रुपयांची रोख पारितोषिके आणि सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले.यामध्ये भोसरी येथील प्रसिद्ध 'कै. दामूशेठ गव्हाणे मित्र मंडळाने' आपल्या उत्कृष्ट देखाव्यासाठी ५१ हजार रुपयांचे प्रथम क्रमांकाचे भव्य पारितोषिक पटकावले आहे.

## भारत-बांगलादेश संबंध पुन्हा तणावात; तरीही भारतीय उच्चायुक्तांची पंतप्रधान तारीक रहमान यांच्याशी भेट कूटनीतीतून तणाव कमी करण्याचा प्रयत्न?

भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंधांमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतीय उच्चायुक्त दिनेश त्रिवेदी यांनी सोमवारी, १० ऑगस्ट २०२६ रोजी बांगलादेशचे पंतप्रधान तारीक रहमान यांची भेट घेतली. माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी ५ ऑगस्ट रोजी नवी दिल्लीतील परदेशी पत्रकारांच्या क्लबमध्ये आभासी पत्रकार परिषद घेऊन तारीक रहमान यांच्या सरकारवर केलेल्या टीकेनंतर ढाका आणि नवी दिल्ली यांच्यातील वातावरण अधिक संवेदनशील झाले आहे.

शेख हसीना यांच्या वक्तव्यावर बांगलादेशने तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे भारताकडून झालेली ही उच्चस्तरीय राजनैतिक भेट महत्त्वाची मानली जात आहे. विशेषतः बांगलादेशमध्ये भारतीय सुरक्षा क्षेत्रातील उच्चस्तरीय शिष्टमंडळही सध्या उपस्थित असताना ही भेट झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भेटीचे वातावरण सलोख्याचे आणि सौहार्दपूर्ण होते. बांगलादेशच्या बाजूने परराष्ट्रमंत्री खलीलुर रहमान आणि पंतप्रधानांचे परराष्ट्रविषयक सल्लागार हुमायून कबीर उपस्थित होते. तर भारतीय उच्चायुक्त दिनेश त्रिवेदी यांच्यासोबत उपउच्चायुक्त पवन बधे उपस्थित होते.

मात्र या भेटीमागील नेमका राजनैतिक संदेश काय आहे, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण एका बाजूला शेख हसीना यांच्या भारतातील राजकीय आणि माध्यमांशी संवादामुळे ढाक्याची नाराजी वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला भारत-बांगलादेश संबंधांमध्ये संवादाचे दरवाजे खुले ठेवण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे.

भारतासाठी बांगलादेश हा केवळ शेजारी देश नाही. सीमा सुरक्षा, व्यापार, नदीपाणी, ईशान्य भारताशी संपर्क, स्थलांतर आणि प्रादेशिक सुरक्षा अशा अनेक संवेदनशील मुद्द्यांवर दोन्ही देशांचे हित परस्परांशी जोडलेले आहे.

त्यामुळे या भेटीकडे केवळ औपचारिक राजनैतिक भेट म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही.

शेख हसीना यांच्या वक्तव्यामुळे निर्माण झालेला तणाव बाजूला ठेवून भारत आणि बांगलादेश पुन्हा संवादाच्या मार्गावर येणार का? की ही भेट केवळ वाढत्या तणावावर नियंत्रण ठेवण्यापुरतीच मर्यादित राहणार?

याचे उत्तर आगामी राजनैतिक हालचालींमधून स्पष्ट होईल.

## 'रोजगार हमी'ची जागा 'रोजगार चोरी'ने घेतली? नव्या ग्रामीण रोजगार योजनेत पहिल्याच महिन्यात कामाची निर्मिती तब्बल ५० टक्क्यांनी घटली!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याची जागा घेतलेल्या 'विकसित भारत रोजगार व आजीविका अभियान – ग्रामीण' या नव्या योजनेवर काँग्रेसने जोरदार हल्ला चढवला आहे. नव्या योजनेच्या अंमलबजावणीच्या पहिल्याच महिन्यात ग्रामीण भागात निर्माण झालेल्या रोजगारात जवळपास ५० टक्क्यांची घट झाल्याचा दावा काँग्रेसने सरकारी आकडेवारीच्या आधारे केला आहे. त्यामुळे काँग्रेसने या नव्या कायद्याला 'रोजगार हमी'ऐवजी 'रोजगार चोरी' असे नाव देण्याची टीका केली आहे.

केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, जुलै २०२६ या नव्या योजनेच्या पहिल्या अंमलबजावणीच्या महिन्यात निर्माण झालेल्या मनुष्य-दिवसांची संख्या, गेल्या वर्षी याच महिन्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत निर्माण झालेल्या मनुष्य-दिवसांच्या तुलनेत ४९.९४ टक्क्यांनी कमी आहे.

'मनुष्य-दिवस' म्हणजे एका व्यक्तीने एका दिवसात केलेल्या कामाचे एकक. त्यामुळे या आकडेवारीचा थेट अर्थ असा लावला जात आहे की, नव्या योजनेच्या पहिल्याच महिन्यात ग्रामीण कामगारांना उपलब्ध झालेल्या कामाच्या संधी मोठ्या प्रमाणात कमी झाल्या आहेत. काँग्रेसने याच मुद्द्यावरून केंद्र सरकारला लक्ष्य केले आहे. ग्रामीण भागातील गरीब, मजूर आणि रोजगारासाठी सरकारी योजनेवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसाठी रोजगार हमी योजना ही केवळ सरकारी योजना नसून उत्पन्नाचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीत जवळपास निम्मी घट झाल्याचा दावा खरा असेल, तर त्याचा थेट परिणाम ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नावर होऊ शकतो. सरकारने जुन्या रोजगार हमी कायद्याची जागा नवी योजना आणून घेतली. मात्र आता पहिल्याच महिन्याची आकडेवारी सरकारच्या या बदलाच्या परिणामकारकतेवर प्रश्न उपस्थित करत आहे. नाव बदलले, कायदा बदलला; पण ग्रामीण कामगारांच्या हाताला काम मिळणार आहे का? हा आता सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. सरकारकडे या घटलेल्या रोजगार निर्मितीचे स्पष्ट कारण आहे का? मागणी कमी झाली म्हणून काम कमी झाले की, सरकारकडूनच रोजगार उपलब्ध करून देण्याचे प्रमाण घटले? ग्रामीण भागात कामाची गरज असताना रोजगाराच्या संधी कमी होत असतील, तर नव्या योजनेचा नेमका फायदा कोणाला होणार? राजकीय आरोप-प्रत्यारोपांपलीकडे सरकारी आकडेवारीत दिसणारी जवळपास ५० टक्क्यांची घट ही गंभीरपणे तपासण्याची गरज आहे. कारण ग्रामीण भारतासाठी प्रश्न केवळ योजनेच्या नावाचा नाहीप्रश्न आहे तो हाताला काम आणि घरात उत्पन्न पोहोचण्याचा.

## मणिपूर हिंसाचाराच्या खटल्यांना आता 'विशेष न्यायालय'! सर्वोच्च न्यायालयाचा मोठा हस्तक्षेप; सीबीआय-एनआयए प्रकरणांची रोज सुनावणी होणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मणिपूर : प्रतिनिधी**

मणिपूरमध्ये २०२३ मध्ये उसळलेल्या जातीय हिंसाचाराच्या जखमा आजही पूर्णपणे भरलेल्या नाहीत. हिंसाचारात जीव गमावलेल्या नागरिकांना न्याय कधी मिळणार, दोषींवर कारवाई कधी होणार आणि वर्षानुवर्षे प्रलंबित राहणाऱ्या तपास व खटल्यांना वेग कधी मिळणार, हा प्रश्न सातत्याने उपस्थित होत आहे. याच पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी, १० ऑगस्ट २०२६ रोजी, मणिपूर हिंसाचाराशी संबंधित केंद्रीय अन्वेषण विभाग आणि राष्ट्रीय तपास संस्थेकडून तपासल्या जाणाऱ्या प्रकरणांसाठी स्वतंत्र विशेष न्यायालये स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना या प्रकरणांसाठी विशेष न्यायालये स्थापन करण्याची विनंती केली आहे. विशेष म्हणजे, केंद्रीय अन्वेषण विभाग आणि राष्ट्रीय तपास संस्थेकडून तपासल्या जाणाऱ्या प्रकरणांसाठी स्वतंत्र न्यायालये असावीत आणि या प्रकरणांची दररोज सुनावणी केली जावी, असा प्रस्ताव सर्वोच्च न्यायालयाने मांडला आहे.

हा प्रस्ताव केवळ न्यायालयीन व्यवस्थेतील बदल नाही, तर मणिपूर हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये न्यायप्रक्रियेला गती देण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

२०२३ मध्ये मणिपूरमध्ये मेईतेई आणि कुकी समुदायांमध्ये झालेल्या संघर्षाने संपूर्ण देशाला हादरवून सोडले होते. मोठ्या प्रमाणावर हिंसाचार, जाळपोळ, हत्या आणि विस्थापनाच्या घटना घडल्या. हजारो नागरिकांना आपली घरे सोडावी लागली. अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. अशा परिस्थितीत गुन्ह्यांचा तपास आणि त्यानंतरची न्यायालयीन प्रक्रिया वेगाने पूर्ण होणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

मात्र तपास पूर्ण झाल्यानंतरही खटले वर्षानुवर्षे चालत राहिले, तर पीडितांना न्याय मिळण्यास विलंब होतो. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने दररोज सुनावणी करणाऱ्या विशेष न्यायालयांची कल्पना पुढे केली आहे.

यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने मणिपूरमधील केंद्रीय अन्वेषण विभागाशी संबंधित प्रकरणे गुवाहाटी येथे हस्तांतरित केली होती. आता त्याच प्रकरणांसाठी स्वतंत्र विशेष न्यायालयांची मागणी करण्यात आली आहे. राष्ट्रीय तपास संस्थेकडून तपासल्या जाणाऱ्या प्रकरणांनाही या व्यवस्थेत स्वतंत्रपणे हाताळण्याचा प्रस्ताव आहे.

पण येथे काही गंभीर प्रश्नही उपस्थित होतात.

विशेष न्यायालये स्थापन झाली तर न्याय किती वेगाने मिळणार? तपास यंत्रणांचा तपास निष्पक्ष आणि प्रभावी आहे का? पीडित आणि साक्षीदारांच्या सुरक्षेची हमी कोण देणार? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जातीय हिंसाचारातील प्रत्येक आरोपीपर्यंत कायद्याचा हात पोहोचणार का?

मणिपूरमधील हिंसाचार हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नव्हता. तो सामाजिक विश्वास, प्रशासनाची भूमिका आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी जोडलेला प्रश्न होता. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रिया जितकी पारदर्शक आणि वेगवान असेल, तितका पीडितांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास मजबूत होऊ शकतो.

सर्वोच्च न्यायालयाचा हा प्रस्ताव सरकार आणि तपास यंत्रणांसाठीही एक स्पष्ट संदेश मानला जाऊ शकतोमणिपूर हिंसाचारातील गंभीर प्रकरणे अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहू नयेत. आता गुवाहाटी उच्च न्यायालय या प्रस्तावावर काय निर्णय घेते आणि विशेष न्यायालयांची स्थापना किती वेगाने होते, याकडे लक्ष लागले आहे. कारण मणिपूरमधील पीडितांसाठी प्रश्न केवळ खटला सुरू होण्याचा नाही; प्रश्न आहे तो न्याय मिळण्याचा. आणि न्यायाला जितका विलंब होतो, तितकाच पीडितांचा व्यवस्थेवरील विश्वास कमी होण्याचा धोका वाढतो.